**<u>निशाणी क्र. यु -२३</u>** **<u>अर्ज (ई.सी.) क्र. सी-१/२०२२</u>**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ३</u>**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | सचिन रघुनाथ पवार |
| **वय** | : | ४३ वर्षे |
| **व्यवसाय** | : | बक्कल नं. १६९९ |
| **राहणार** | : | पोलिस मुख्यालय, सांगली |

**<u>सरतपासणी अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एन. एम. महाजन यांचेमार्फत सुरू</u>**

दि. १३/१२/२०१८ रोजी माझी नेमणुक संजयनगर, पोलिस स्टेशन येथे होती. त्यादिवशी मी स्टेशन डायरी कर्तव्यावर असताना सायंकाळी ५:०० वाजण्याच्या सुमारास आदित्य हॉस्पीटलमधून वैद्यकीय अधिकारी राऊत यांनी फोनव्दारे विद्या विनायक पवार या दुर्गामाता पॅकेजिंग प्रा. लि. या कंपनीत काम करीत असताना त्यांच्या डाव्या हातास मशिनरीमध्ये अडकून दुखापत झाल्याची माहिती दिली आणि कंपनीच्या ड्रायव्हर राहुल पडळकर यांनी त्यांना उपचाराकरीता दाखल केल्याची माहिती दिली. त्यासंदर्भात मी नोंद घेवून स.प.प. खरमाटे यांना जखमीचा जबाब घेण्याचे आदेश दिले. स्टेशन डायरी उतारा आता मला दाखविला, तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर उतारा निशाणी क्र. यु-१७ वर आहे.

**<u>उलटतपासणी जाबदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. पी. एच. जोशी यांचेमार्फत सुरू</u>**

डॉ. राउत यांचा फोन मी स्वत: घेतला होता. वैद्यकिय अधिकारी यांनी कंपनीचे नाव व जखमीचे नाव सांगितले नव्हते हे म्हणणे खरे नाही. मी स्वत: चौकशी केलेली नाही. माझे सरतपासातील मजकुर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही.

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

**सही/-**

( एस. जी. कोरे )

आयुक्त,
कर्मचारी नुकसानभरपाई कायदा तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली

स्थळ : सांगली
दि. २८/११/२०२५